**महत्वाचे**

**जा.क्रं. उमाशि-३/पुवि/इ.१२वी प्रवेश/२०१३-१४**
**शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,**
**पुणे १ यांचे कार्यालय**
**दिनांक १२/६/२०१३**

**प्रति,**

**प्राचार्य / मुख्याध्यापक**
----------------------
------------------------

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये इयत्ता १२ वी प्रवेशासाठी अंमलात आणावयाच्या कार्यपध्दतीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत विद्यार्थी, पालक व विविध शैक्षणिक संस्था आणि संघटना या कार्यालयाकडे इयत्ता १२ वी वर्गात प्रवेशाबाबत लेखी पत्रान्वये व तोंडी विचारणा करतात. इयत्ता १२ वी वर्गात प्रवेश पात्र विद्यार्थ्यांला नियमाप्रमाणे प्रवेश देण्याचे काम आपले कनिष्ठ महाविद्यालयाचे स्तरावरुन होत असते. त्यासाठी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

इयत्ता १२ वी प्रवेशाबाबत खाली दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन आपल्या स्तरावरुन नियमाप्रमाणे गुणवत्तेनुसार पात्र विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यात यावेत त्याकरीता या कार्यालयाशी वेगळा पत्रव्यवहार करुन परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

**अटी :**

१. **इयत्ता १२ वी मधील संबंधित शाखेची कमाल प्रवेश क्षमता विचारात घेवून त्याचे मर्यादेत तसेच खालील बाबतीत प्रवेश मान्य करता येतील.**

२. **इयत्ता १२ वी प्रवेशासाठी मागणी करणारा विद्यार्थी स्थानिक कनिष्ठ महाविद्यालयातून इयत्ता ११ वी पास असू नये म्हणजेच इयत्ता १२ वी प्रवेश हा स्थानिक परिसरातील असल्यास अमान्य होईल याची नोंद घ्यावी.**

३. **इयत्ता १२ वी वर्गात प्रवेश मान्य करताना संबंधित विद्यार्थी यांचे संवर्गानुसार इयत्ता ११ वी वर्गातील प्रवेशाचे कट ऑफ पॉईंट पाहून त्यानुसारच शिल्लक जागेवर प्रवेश मान्य करता येईल. तफावत आढळल्यास प्रवेश अमान्य करण्यात येतील.**

४. **शाखा बदल /अभ्यासक्रम बदल करुन एखादया विद्यार्थ्यांस इयत्ता १२ वी मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश हवा असल्यास असा प्रवेश नियमानुसार मान्य करता येईल.**

उपरोक्त १ ते ४ अटींचे अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन इ. १२ वी वर्गातउपलब्ध जागा गुणवत्तेनुसार व संवर्गानुसार नियमानुसार भरण्याची जबाबदारी आपली असल्यामुळे त्यापध्दतीने प्रवेशाबाबतचे काम आपल्या स्तरावरुन करण्यात यावे. इ. १२ वी प्रवेशाबाबत या कार्यालयाची लेखी अथवा तोंडी सहमती आणणेबाबत विदयार्थ्यांस / पालकांस या कार्यालयाकडे पाठवू नये.

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (**www.dydepune.com**) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

**(सुमन शिंदे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे १**